# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/05/2023 (सोमवार) दुपार

---

## चोरी

**१) पो.स्टे. अरोली** :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा अरोली येथे दिनांक २९/०४/२०२३ ते दिनांक ३०/०४/२०२३ चे रात्री १२ चे सुमारास स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच.- ४०/बी. जे.- ३९१९ तसेच रामकृष्ण वाडीभस्मे यांचा ट्रॅक्टर क्र. एम. एच. -४०/ए. एम.- ११९५ तसेच प्रशांत भुरे यांचा ट्रॅक्टर क्र. एम. एच. -४० पी. एच.- ५८८५ तसेच जागेश्वर नत्थु हटवार यांचा ट्रॅक्टर क्र. एम एच -४०/सी. ए.- ८०१३ असा असुन यांचे ट्रॅक्टर रामकृष्न वाडीभस्मे यांचे घरा समोर खाली जागा असल्याने ठेवले होते. दिनाक २९/०४/२०२३ ते ३०/०४/२३ चे रात्री (१) स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच ४०-बी.जे.- ३९१९ ची बॅटरी किंमती अंदाजे ३०००/-रु (२) ट्रॅक्टर क्र. एम एच -४० ए. एम- ११९५ ची बॅटरी किंमती अंदाजे ३०००/-रु, (३) ट्रॅक्टर एम एच -४० पी एच ५८८५ ची बॅटरी किंमती अंदाजे २०००/-रु, (४) ट्रॅक्टर क्र. एम एच -४०/सी. ए- ८०१३ ची बॅटरी किंमती अंदाजे २०००/-रु असा एकुण १००००-/रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना ईंगळे ब. नं. ८०६ पोस्टे अरोली मो. नं. ७६६६०१५२०४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :- अंतर्गत १० किमी अंतरावर आमडी येथे दिनांक २९/०४/२०२३ चे ०७/३० वा. ते दिनांक ३०/०४/२०२३ चे ०९/०० वा. दरम्यान शेतात पाणी देण्याकरीता ३ फेसचा जनरेटर बोरवेल जवळ लावला होता तो कोणीतरी अज्ञात चोराने बोरवेल जवळ लावलेला जनरेटर किंमती अंदाजे ३५,०००/- रू. चा चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- सिताराम जगन भारव्दाज, वय ६३ वर्ष, रा. आमडी वार्ड क्र. १ ता. पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१२८७ राजेंद्र अडामे हे करीत आहे.

# जबरी संभोग

पो.स्टे. बेला :- दिनांक २८/०५/२०२२ चे १०/०० वा. ते ३०/११/२०२२ पर्यत वेळोवेळी फिर्यादी/पिडीता वय १४ वर्ष १० महिने ०२ दिवस ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा **आरोपी नामे- विशाल अंकुश भोडमाके, वय २५ वर्ष रा. बोरीमजरा ता. उमरेड जि. नागपुर** याने फिर्यादीला तुझ्यासोबत लग्न करतो असे बोलुन लग्नाचे आमीश दाखवुन तिचे सोबत वारंवार शारीरीक संबंध प्रस्थापीत करून त्यामधुन ती गर्भवती झाल्याने तिचा गर्भपात करण्याचे उद्देशाने तिला गर्भपाताचे गोळया देवुन गर्भपात करण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (एन), ३७६ (३) भादवी सहकलम ४, ६ बाल लैंगीक अत्याचार अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राहुल ठेंगणे पोस्टे बेला मो. नं. ९८२३३६४१४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर